## निशाणी क्र. ५५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ याने त्याचेविरुध्द झालेला दिनांक ०५/०४/२०१६ इ. रोजी झालेला एकतर्फा आदेश रद्द होणेसाठी दाखल केला आहे. त्याचे म्हणणेनुसार तो नोकरी निमित्त मुंबई येथे असतो. त्याच्या कामधंदयामुळे त्याला वकीलांशी संपर्क साधता न आल्याने नेमले तारखेस तो न्यायालयात उपस्थित राहून खटल्याचे कामी हजर होवू शकला नाही. त्यामुळे त्याचे विरुध्द एकतर्फा आदेश झालेला आहे. सबब, त्याच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रदद् होवून त्याची कैफियत स्विकारण्याची विनंती त्याने केली आहे.

२. वादी याने सदर अर्जास म्हणणे दाखल करुन प्रतिवादी क्र. १ याचे अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याचे म्हणणेनुसार अर्जात नमूद केलेले कारण योग्य व संयुक्तिक नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

३. वादी व प्रतिवादी क्र. १ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत प्रतिवादी क्र. १ याने अर्जाचे पुष्ठयर्थ शपथपत्र सादर केले आहे. यावरुन प्रस्तुत प्रतिवादीचे अर्जातील नमूद कारण योग्य आहे असे मानता येईल. वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी दाखल केला आहे. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र. १ याचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन प्रतिवादी क्र. १ याला आपली बाजू मांडण्याची संधी देणे न्यायोचित वाटते. मात्र झालेल्या विलंबाबाबत प्रतिवादी १ याने खर्च देणेबाबत आदेश पारित करणे न्यायोचित वाटते. परिणामी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे :

**— <u>आदेश</u> —**

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ याला कैफियत दाखल करण्यास खालील अटीवर परवानगी देण्यात येते.

३. प्रतिवादी क्र. १ याने पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम रुपये ४००/— दयावी. त्यापैकी प्रतिवादी १ याने रक्कम रुपये २००/— वादीस दयावी व उर्वरित रक्कम रुपये २००/— सरकार जमा करावी.

स्थळ : देवगड
दिनांक : ०४/११/२०१६

( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.